## <u>भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 कलम 19 नुसार अधिसुचना</u>

क्र./भूसंपादन/मौजे.कडगाव/एसआर/281/2018. दि. 30 / 04 / 2021.

ज्याअर्थी,समुचीत शासन असलेल्या जळगांव जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमीसंपादन, पूनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम , 2013 (2013 चा 30 ) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोट कलम (1) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्र.भूसंपादन/मौजे.कडगाव/ एसआर/281/2018 दि. 01.02.2021 अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी जळगांव (जिल्हाच्या) जिल्हाधिका-याने , कलम 15 च्या पोट कलम (2) अन्वये दिलेला अहवाल , कोणताही असल्यास , विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदींन्वये,उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी,अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून,पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांक्ष अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी ,उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी,उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव ता.जि.जळगांव यांना (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिका-यांचे नाव व पत्ता नमूद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

(कृ.मा.प.)

## अनुसूची - एक
## जमिनीचे वर्णन
### गाव- मौजे.कडगाव तालुका- जळगांव , जिल्हा-ज़ळगांव

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित संपादन क्षेत्र | |
|---|---|---|---|
| | | लावणी लायक संपादन क्षेत्र (हे.आ.मध्ये) | एकुण क्षेत्र (हे.आ.मध्ये) |
| 1 | 82 | 0.05 | 0.05 |
| 2 | 83 | 0.37 | 0.37 |
| 3 | 84 | 0.10 | 0.10 |
| 4 | 85 | 0.04 | 0.04 |
| 5 | 86 | 0.01 | 0.01 |
| 6 | 87 | 0.01 | 0.01 |
| 7 | 88 | 0.01 | 0.01 |
| 8 | 90 | 0.02 | 0.02 |
| 9 | 91 | 0.07 | 0.07 |
| 10 | 92 | 0.03 | 0.03 |
| 11 | 93 | 0.02 | 0.02 |
| 12 | 79 | 0.02 | 0.02.50 |
| 13 | 63 | 0.88 | 0.88 |
| 14 | 106 | 0.40 | 0.40 |
| 15 | 107 | 0.74 | 0.74 |
| 16 | 62 | 0.34 | 0.34 |
| 17 | 110 | 0.42 | 0.42 |
| 18 | 115 | 0.34 | 0.34 |
| 19 | 114 | 0.28 | 0.28 |
| 20 | 149 | 1.08 | 1.08 |
| 21 | 60 | 2.16 | 2.16 |
| 22 | 59 | 0.12 | 0.12 |
| 23 | 31 | 0.04 | 0.04 |
| 24 | 32 | 0.37 | 0.37 |
| 25 | 34 | 0.15 | 0.15 |
| 26 | 35 | 0.77 | 0.77 |
| 27 | 36 | 1.08 | 1.08 |
| 28 | 37 | 0.84 | 0.84 |
| | एकुण | 10.76.50 | 10.76.50 |

## अनुसूची - दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव - मौजे.कडगाव ता.जळगांव जि.जळगांव येथील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प

प्रकल्पकार्याचे वर्णन - मौजे.कडगाव ता.जळगांव जि.जळगांव येथील शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या कडगाव जोगलखेडा पर्यायी रस्त्यासाठी संपादन

समाजाला मिळणारे लाभ - पोहोच पर्यायी रस्त्यासाठी

## अनुसूची - तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

निरंक

## अनुसूची - चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

निरंक

टिप : -

1. प्रस्तावित संपादनाखालील उक्त शेतजमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी कार्यालय जळगांव भाग जळगांव व कार्यकारी अभियंता जळगांव मध्यम प्रकल्प विभाग क्र.2 जळगांव यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.
2. उक्त अधिसूचना प्रसिध्द झालेल्या तारखेपासून तर कार्यवाही पुर्ण होईपर्यंत प्रारंभिक उल्लेख केलेल्या जमिनीचा कोणत्याही व्यक्तीने व्यवहार करू नये किंवा सदर जमिनीवर बोजा व अडथळा करू नये.
3. संबंधित तलाठी यांनी संबंधित 7/12 उता-यावर संपादनाबाबत नोंद घ्यावी.
4. दुय्यम निबंधक, जळगांव यांनी संपादनाखालील गटाच्या खरेदी विक्रीवर निर्बंधाबाबत कायदयानूसार कार्यवाही करावी

दिनांक - 30/04/2021

ठिकाण - जळगांव.

( प्रसाद मते )
उपविभागीय अधिकारी
जळगाव भाग जळगाव

COLLECTOR JALGAON

(अभिजीत राऊत)
जिल्हाधिकारी जळगाव
तथा समुचित प्रशासन